गांवकरी
www.gavakari.net
24 Jul 2025 - Page 6

# वाघ, बोरस्ते यांचे कार्य निरंतर : कदम

## संयुक्त पुण्यतिथीनिमित्त कर्मवीरांना आदरांजली

**नाशिक : प्रतिनिधी**



शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या उपेक्षित व्यक्ती व घटकाचा विकास होण्यासाठी शिक्षण संस्थांची स्थापना झाली. कर्मवीर काकासाहेब वाघ यांचा राजकारणातील करारीपणा वाखाणण्याजोगा होता. कामकाजात दर्जा कसा टिकून राहील, यावर त्यांनी नेहमी भर दिला. त्याचाच सकारात्मक परिणाम म्हणजे के. के. वाघ शिक्षण संस्थेने नावलौकिक प्राप्त केला. काकासाहेब वाघ व माधवराव बोरस्ते यांचे कार्य निरंतर चालणारे आहे, असे प्रतिपादन माजी आमदार अनिल कदम यांनी केले.

के. के. वाघ शिक्षणसंस्था, नाशिकतर्फे कै. देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ, दानशूर कै. रतनशी हरिदास उदेशी तथा काकूशेठ उदेशी व सहकारमहर्षी कै. माधवराव ऊर्फ तात्यासाहेब बोरस्ते यांचा संयुक्त पुण्यस्मरण कार्यक्रम संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात ऑनलाइन व ऑफलाइन स्वरूपात झाला.

याप्रसंगी विशेष उपस्थिती म्हणून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले उपस्थित होते. कादवा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त शकुंतलाताई वाघ, मराठा विद्या प्रसारक संस्थेचे माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, माजी सभापती माणिकराव बोरस्ते, माजी अध्यक्ष अरविंद कारे, संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, निफाड तालुक्यातील ग्रामस्थ व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संस्थाध्यक्ष समीर वाघ यांनी मान्यवरांचा सत्कार केला. कार्यक्रमाची सुरुवात संस्था गीताने झाली. प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी प्रास्ताविक केले. या ऑनलाइन कार्यक्रमास नऊशेहून अधिक जण उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती पवार यांनी केले. कार्यक्रमाची सांगता हर्षद वडजे यांनी पसायदानाने केली.